आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
२० एप्रिल २०२६ - सोमवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- भारत आणि दक्षिण कोरिया यांच्यात  विविध क्षेत्रात सामंजस्य करार

- अमेरिका आणि इराण यांच्यातल्या शस्त्रसंधीविषयक चर्चेच्या दुसऱ्या फेरीबाबत अनिश्चितता

- चालू आर्थिक वर्षात भारताचा जीडीपी ६ पूर्णांक ८ दशांश टक्के  ते ७ पूर्णांक १ दशांश टक्के राहील, असा स्टेट बँक रिसर्चचा अहवाल

**आणि**

- जम्मू काश्मीरमधे उधमपूर जिल्ह्यात बस दरीत कोसळल्यानं २१ जणांचा मृत्यू, तर २९ जण जखमी

**<><><><><>**

भारत आणि दक्षिण कोरिया यांच्यात आज क्रीडा, सांस्कृतिक आणि सर्जनशील उद्योग, लघु आणि मध्यम उद्योग तसंच औद्योगिक सहकार समिती आदी क्षेत्रात सामंजस्य करार झाले. त्याचप्रमाणे सर्वसमावेशक आर्थिक भागीदारी करार आणि भारत-कोरिया डिजिटलब ब्रिज फ्रेमवर्कचं अद्ययावतीकरण करण्यासाठी चर्चा पुन्हा सुरू करण्याकरता संयुक्त निवेदन दोन्ही देशांनी स्वीकारलं. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि दक्षिण कोरियाचे अध्यक्ष ली जे म्यूंग यांच्यात झालेल्या चर्चेनंतर या करारांवर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या.

जागतिक तणावाच्या या काळात भारत आणि दक्षिण कोरिया शांतता आणि स्थैर्याचा संदेश देत आहेत, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी संयुक्त निवेदनात केलं. भारत आणि दक्षिण कोरिया यांच्यातला व्यापार २७ अब्ज डॉलरपर्यंत पोहोचला असून २०३० पर्यंत तो ५० अब्ज डॉलरपर्यंत वाढवण्याच्या दृष्टीने आज करार करण्यात आल्याचं प्रधानमंत्र्यांनी सांगितलं.

पुढल्या दशकाच्या यशाचा पाया आज दोन्ही देश घालत आहेत, शांततापूर्ण, प्रगत आणि सर्वसमावेशक इंडो-पॅसिफिक क्षेत्रासाठी भारत आणि दक्षिण कोरिया योगदान देत असल्याचं प्रधानमंत्री म्हणाले. कृत्रिम बुद्धिमत्ता, सेमिकंडक्टर आणि माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातली भागीदारी अधिक दृढ करण्यासाठी भारत-कोरिया डिजिटल ब्रिज सुरू केलं आहे, असं त्यांनी सांगितलं.....

**होल्ड - मोदी सहकार्य**

**भारताचं** नेतृत्व ग्लोबल साऊथमधे पुढे येत असून संरक्षण, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि जहाजबांधणी क्षेत्रात भारत आणि दक्षिण कोरिया यांच्यातलं सहकार्य वाढत असल्याचं दक्षिण कोरियाचे अध्यक्ष ली जे म्युंग यांनी यावेळी सांगितलं. पश्चिम आशियात शांतता प्रस्थापित होण्याविषयी आपण प्रधानमंत्री मोदी यांच्याशी चर्चा केल्याचं म्युंग म्हणाले.

**भारत आणि** दक्षिण कोरिया यांच्यातला व्यापार २७ अब्ज डॉलरपर्यंत पोहोचला असून पुढल्या चार वर्षांत तो दुप्पट होणार असल्याचं वाणिज्य आणि उद्योजकता मंत्री पीयूष गोयल यांनी सांगितलं. ते आज नवी दिल्लीत भारत-दक्षिण कोरिया बिझनेस फोरमच्या उद्घाटनाच्या सत्रात बोलत होते. दक्षिण कोरियाच्या अध्यक्षांची भारत भेट दोन्ही देशाच्या संबंधाचा एक नवा अध्याय सुरू करेल, दोन्ही देशांनी सर्वसमावेशक आर्थिक भागीदारी पुढे घेऊन जायला सहमती दर्शवली आहे, असंही गोयल यांनी सांगितलं.

**<><><><><>**

अमेरिका आणि इराण यांच्यातल्या पाकिस्तानमध्ये होणाऱ्या शस्त्रसंधीविषयक चर्चेच्या दुसऱ्या फेरीबाबत अनिश्चितता आहे. अमेरिकेबरोबरच्या चर्चेच्या पुढच्या फेरीत सहभागी व्हायचं की नाही, याबाबत इराणने कुठलाही निर्णय घेतलेला नसल्याचं इराणच्या परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते इस्माईल बाकाई यांनी सांगितलं. ते

आज तेहरानमध्ये पत्रकार परिषदेला संबोधित करत होते. मध्यम मार्ग काढण्याबाबत अमेरिका पुरेशी गंभीर नसल्याचा दावा बाकाई यांनी केला. दरम्यान, होर्मुझच्या सामुद्रधुनीत नाकेबंदी चुकवण्याचा प्रयत्न करणाऱ्या एका इराणी जहाजाला अमेरिकन नौदलाने लक्ष्य केल्याचं अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

अमेरिका आणि इराणमधल्या युद्धविराम कराराबाबत अनिश्चितता निर्माण झालेली असताना हॉर्मुझच्या सामुद्रधुनीतून जहाजांच्या विनाशुल्क आणि मुक्त दळणवळणासाठी ब्रिटननं आग्रही भूमिका घेतली आहे. या जागतिक तेल मार्गावरून प्रवास करणाऱ्या जहाजांवर कोणतेही निर्बंध किंवा शुल्क नसावे, यासाठी ब्रिटन प्रयत्नशील आहे. जागतिक पुरवठा साखळी सुरक्षित ठेवण्यासाठी, आंतरराष्ट्रीय कायद्यांचं पालन करण्यासाठी आणि ऊर्जा प्रवाहातले अडथळे रोखण्यासाठी जागतिक स्तरावर समन्वयानं कारवाई आवश्यक असल्याचं ब्रिटनच्या परराष्ट्र सचिव य्वेट कूपर यांनी सांगितलं. दरम्यान, युद्ध संपल्यानंतर या मार्गावर शुल्क आकारण्याचा प्रस्ताव इराणनं मांडला आहे. या प्रस्तावाला ब्रिटननं विरोध दर्शवला आहे.

**<><><><><>**

महिला आरक्षणासाठीचं १३१ वी घटनादुरूस्ती विधेयक संसदेत नामंजूर झाल्याच्या पार्श्वभूमीवर विधेयकाच्या बाजूने जनमत वळवण्यासाठी भाजपने देशभरात मोहीम हाती घेतली आहे. त्याचा भाग म्हणून राज्यात एक कोटी महिलांच्या सह्या गोळा करणार असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी जाहीर केलं. ते आज मुंबईत वार्ताहर परिषदेत बोलत होते. यासह महिला आरक्षण विधेयकाबाबत तालुकास्तरावर जनजागृती करणार असून आरक्षण मिळेपर्यंत स्वस्थ बसणार नाही असं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

**- - होल्ड बाईट सीएम - -**

**महिला** आरक्षणाच्या नावाखाली सरकारला मतदारसंघ पुनर्रचना विधेयक मंजूर करून घ्यायचं होतं, हा डाव काँग्रेससह विरोधी पक्षांनी हाणून पाडला असं काँग्रेस नेत्या खासदार प्रणिती शिंदे म्हणाल्या. त्या मुंबईत वार्ताहर परिषदेत बोलत होत्या. मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्यासोबत या विधेयकावर खुल्या चर्चेला काँग्रेस तयार आहे, असंही त्या म्हणाल्या. खासदार शोभा बच्छाव याही यावेळी उपस्थित होत्या.

**<><><><><>**

पश्चिम आशियातला तणाव आणि तेलाच्या संकटामुळे निर्माण झालेल्या जागतिक आव्हानांचा सामना करण्यासाठी भारत सक्षम आहे, असं एसबीआय रिसर्च अर्थात स्टेट बँक ऑफ इंडिया रिसर्चच्या ताज्या अहवालात म्हटलं आहे. २०२६-२७ या आर्थिक वर्षात भारताचा जीडीपी म्हणजेच विकास दर ६ पूर्णांक ८ दशांश टक्के ते ७ पूर्णांक १ दशांश टक्के राहील असा अंदाज या अहवालात व्यक्त केला आहे. २०२५-२६ मध्ये भारताचा विकास दर ७ पूर्णांक ६ दशांश टक्के राहण्याचा प्राथमिक अंदाज आहे.

या अहवालात महागाईचा दर साडेचार टक्के, तर वित्तीय तूट साडेचार ते ४ पूर्णांक ६ दशांश टक्के राहण्याची शक्यता आहे. तापमानवाढ आणि जागतिक संघर्षांमुळे कृषी तसंच लघु उद्योगांसमोर काही आव्हानं असली, तरी भारताची बँकिंग व्यवस्था स्थिर असून जागतिक पुरवठा साखळीत भारतासाठी नवीन संधी उपलब्ध असल्याचंही अहवालात म्हटलं आहे.

**<><><><><>**

जम्मू-काश्मीरच्या उधमपूर जिल्ह्यात रामनगर भागातल्या कागोट गावाजवळ आज सकाळी एका प्रवासी बसला झालेल्या भीषण अपघातात किमान २१ जणांचा मृत्यू झाला असून २९ जण जखमी झाले. जखमींना तातडीनं जवळच्या रुग्णालयात दाखल केलं असून, काही जणांची प्रकृती चिंताजनक आहे. दोन गंभीर

जखमींना हवाई रुग्णवाहिकेनं जम्मूच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात हलवण्यात आले आहे.

रामनगरहून उधमपूरला जाणारी ही बस एका अवघड वळणावर चालकाचं नियंत्रण सुटल्यानं खोल दरीत कोसळली. या बसमध्ये ५० प्रवासी होते. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, उपराज्यपाल मनोज सिन्हा आणि मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांच्यासह अनेक नेत्यांनी या घटनेबद्दल शोक व्यक्त केला आहे.

प्रधानमंत्र्यांनी मृतांच्या नातेवाईकांना प्रत्येकी २ लाख रुपये आणि जखमींना ५० हजार रुपयांची मदत जाहीर केली आहे. तर मुख्यमंत्री साहाय्यता निधीतून मृतांच्या कुटुंबांना २ लाख रुपये, गंभीर जखमींना १ लाख रुपये आणि किरकोळ जखमींना २५ हजार रुपयांची मदत जाहीर झाली आहे.

**<><><><><>**

निवडणुकीपूर्वी, राजकीय पक्षांकडून केल्या जाणाऱ्या मोफत योजनांच्या घोषणांसंदर्भात सर्वोच्च न्यायालयानं केंद्र सरकार, निवडणूक आयोग तसंच भारताचे नियंत्रक आणि महालेखापरीक्षक यांना नोटीस बजावली आहे. अशा मोफत योजनांच्या घोषणा करायला बंदी घालण्याची मागणी करणाऱ्या एका जनहित याचिकेवर सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची यांच्या खंडपीठानं ही नोटीस बजावली.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज अहमदाबाद इथं गुजरात टायटन्स आणि मुंबई इंडियन्स यांच्यात सामना सुरु आहे. गुजरात टायटन्सनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा मुंबई इंडियन्सच्या ९ षटकात ३ बाद ६८ धावा झाल्या होत्या.

**//<><><><><>//**